VOL- IX | ISSUE- VII | JULY | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x

# उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात सहशालेय उपक्रमाच्या योगदानाचा चिकित्सक अभ्यास

**डॉ. महादेव सदाशिव डिसले**
सहयोगी प्राध्यापक
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी
E-mail-sdisale4@gmail.com

***सारांश (Abstract)***

*प्रत्येक शाळेमध्ये वर्गात निर्धारित अभ्यासक्रमांच्या मदतीने विद्यार्थ्यांना ज्ञान दिले जाते व त्याची शैक्षणिक वर्षाखेर परीक्षा ही घेतली जाते. तथापि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडूवन आणण्याच्या दृष्टींने तेवढे पुरेसे ठरत नाही. केवळ बौध्दिक अथवा ज्ञानात्मक विकासाव्दारे मुलांचा सर्वांगीण विकास होत नाही. तर या बरोबरच शारीरिक, सामाजिक, मानसिक, नैतिक, सांस्कृतिक विकास साधण्यासाठी अभ्यासक्रमीय कार्यक्रमाला जोडून अभ्यासपूरक कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक आहे.*

*वर्गात विविध विषयांच्या अध्यापनाचे कार्य शिक्षक करत असतात. प्रत्येक शिक्षक आपापल्या विषयाचे अध्यापन करुन विद्यार्थ्यांना ज्ञानात्मक आणि बौध्दिक विकासाच्या दृष्टींने तयार करत असतो. परंतू शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी या अभ्यसक्रमास पूरक कार्यक्रमाचे आयोजन करावे की ज्यामुळे अध्ययन - अध्यापन प्रक्रिया जास्त परिणामकारक ठरावी यासाठी शाळेत विभिन्न प्रकारचे सांस्कृतिक, शारीरिक शिक्षण,सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.*

*विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सहशालेय उपक्रमाची आवश्यकता असून सर्वच शाळेत सहशालेय उपक्रम राबविले जातात. विदयार्थी हे राष्ट्राची संपत्ती असून ती जपणे अतिशय महत्वाचे आहे. शाळेत परिपाठाबरोबर इतर उपक्रम राबविले जावेत. शाळेत विद्यार्थ्यांच्या अभिरुचीनुसार उपक्रमाची निवड करण्यात येते, विदयार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होतो, समाजास शाळेबद्दल आपुलकी वाटत्े, विदयार्थ्यांच्या सर्व क्षमतांचा विकास सहशालेय उपक्रमातून घडून येतो.*

*आजच्या विदयार्थ्याला स्पर्धेशिवाय पर्याय राहिला नाही. वाढती लोकसंख्या, ज्ञानाचा होणारा विस्फोट व अत्याधुनिक विज्ञान, नवीन तंत्रज्ञान, जीवघेणी स्पर्धा यामध्ये टिकून राहायचे असेल तर सकारात्मक विचार व सामान्य ज्ञान व स्वत:ऍक्टिव्ह असणे महत्त्वाचे आहे.*

*त्यासाठी वाचन, निरीक्षण, व आकलन या क्षमतांचा विकास करणे गरजेचे आहे हे विदयार्थ्यांना समजून देण्याचा संशोधकाने प्रयत्न केला आहे. ग्रामीण भागातील विदयार्थ्यांना सहशालेय उपक्रम राबविताना अनेक अडचणी येतात या अडचणी सोडविण्यासाठी सर्वस्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे. संशोधकाने संशोधन करत असताना सहशालेय उपक्रमाची चांगल्या प्रकारे माहिती झाली. सहशालेय उपक्रमात काही अडचणी आल्यास त्यावर मात करुन उपक्रम यशस्वी करण्याचा संशोधकाचा मानस आहे. सहशालेय उपक्रमामुळे विदयार्थ्यांचा सर्वागिण विकास व सामाजिकरणाच्या प्रक्रियेच चालना मिळते विदयार्थी आत्मविश्वासू, चंचल, विज्ञाननिष्ठ देशप्रेमी, सामाजिक जाणिव निर्माण होण्यास सहशालेय उपक्रम राबविणे अतिशय महत्त्वाचे आहे.*

*सहशालेय उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा प्रयत्न होत असल्याचे दिसून येते. डी.एस.कोठारी आयोगाने या बाबत आपल्या अहवालात असे म्हटले आहे की, चारित्र्याची घडण कृतीव्दारे होत असते, विद्यार्थी शाळा,घर आणि समाज यांचया प्रांगणात ज्या विद्याविषयक सामाजिक, सांस्कृतिक, शारीरिक व नैतिक कृती पार पाडत असतो त्यांचा कधीही पुसला न जाणारा ठसा त्याच्या मनावर उमटत असतो.*

*विद्यार्थ्यांच्या अभिरुची, अभिवृत्ती जाणून घेण्याचे काम सहशालेय उपक्रमांच्या मदतीने होते. त्यामुळे विद्यार्थ्यांत विविध मूल्ये रुजवता येतील. याचे आकलन या संशोधनावरुन होईल.*

*विद्यार्थ्यांच्या प्रज्ञा मुक्त करण्याच्या दृष्टींने पालक, शिक्षक व उच्च प्राथमिक शाळा विविध पातळीवर प्रयत्न करताना दिसतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टींने हे संशोधन उपयोगी पडेल विद्यार्थ्यांच्या ४H म्हणजे Head, Heart, Hand आणि Health च्या एकात्मिक विकासासाठी सर्जनशील उपक्रमांची आवश्यकता असते.*

*प्रस्तूत संशोधनासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीमधील शालेय सर्वेक्षण पध्दतीचा वापर केलेला आहे. शिक्षकांसाठी प्रश्नावली तर मुख्याध्यापकांसाठी मूलाखत सूची हे संशोधन साधन वापरुन माहिती संकलित केली होती. संभाव्यतेवर आधारित सुगम यादृच्छिक*

*नमुना निवड पध्दतीतील लॉटरी पध्दतीचा वापर करुन जवळपास/सुमारे ४८% शिक्षकांची तर ३३.३३% इतक्या मुख्याध्यापकांची संशोधकाने नमुना निवड केली तसेच शेकडेवारी या तंत्राचा वापर करुन प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले.*

*बार्शी तालुक्यातील उच्च प्राथमिकस्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्त्व तसेच सर्वांगीण विकासात सहशालेय उपक्रमांचे योगदान महत्त्वपूर्ण असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जडणघडणीत मोलाचे योगदान ठरते.*

***मुख्य शब्द : - ( उच्च प्राथमिक स्तर, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास, सहशालेय उपक्रम)***

**प्रस्तावना**

प्रत्येक शाळेमध्ये वर्गात निर्धारित अभ्यासक्रमांच्या मदतीने विद्यार्थ्यांना ज्ञान दिले जाते व त्याची शैक्षणिक वर्षाखेर परीक्षा ही घेतली जाते. तथापि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडूवन आणण्याच्या दृष्टींने तेवढे पुरेसे ठरत नाही. केवळ बौध्दिक अथवा ज्ञानात्मक विकासाव्दारे मुलांचा सर्वांगीण विकास होत नाही. तर या बरोबरच शारीरिक, सामाजिक, मानसिक, नैतिक, सांस्कृतिक विकास साधण्यासाठी अभ्यासक्रमीय कार्यक्रमाला जोडून अभ्यासपूरक कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक आहे.

वर्गात विविध विषयांच्या अध्यापनाचे कार्य शिक्षक करत असतात. प्रत्येक शिक्षक आपापल्या विषयाचे अध्यापन करुन विद्यार्थ्यांना ज्ञानात्मक आणि बौध्दिक विकासाच्या दृष्टींने तयार करत असतो. परंतू शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी या अभ्यसक्रमास पूरक कार्यक्रमाचे आयोजन करावे की ज्यामुळे अध्ययन - अध्यापन प्रक्रिया जास्त परिणामकारक ठरावी यासाठी शाळेत विभिन्न प्रकारचे सांस्कृतिक, शारीरिक शिक्षण,सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सहशालेय उपक्रमाची आवश्यकता असून सर्वच शाळेत सहशालेय उपक्रम राबविले जातात. विदयार्थी हे राष्ट्राची संपत्ती असून ती जपणे अतिशय महत्वाचे आहे. शाळेत परिपाठाबरोबर इतर उपक्रम राबविले जावेत. शाळेत विद्यार्थ्यांच्या अभिरुचीनुसार उपक्रमाची निवड करण्यात येते, विदयार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होतो, समाजास शाळेबद्दल आपुलकी वाटते, विदयार्थ्यांच्या सर्व क्षमतांचा विकास सहशालेय उपक्रमातून घडून येतो.

आजच्या विदयार्थ्यांला स्पर्धेशिवाय पर्याय राहिला नाही. वाढती लोकसंख्या, ज्ञानाचा होणारा विस्फोट व अत्याधुनिक विज्ञान, नवीन तंत्रज्ञान, जीवघेणी स्पर्धा यामध्ये टिकून राहायचे असेल तर सकारात्मक विचार व सामान्य ज्ञान व स्वत: ऍक्टिव्ह असणे महत्त्वाचे आहे.

त्यासाठी वाचन, निरीक्षण, व आकलन या क्षमतांचा विकास करणे गरजेचे आहे हे विदयार्थ्यांना समजून देण्याचा संशोधकाने प्रयत्न केला आहे. ग्रामीण भागातील विदयार्थ्यांना सहशालेय उपक्रम राबविताना अनेक अडचणी येतात या अडचणी सोडविण्यासाठी सर्वस्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे. संशोधकाने संशोधन करत असताना सहशालेय उपक्रमाची चांगल्या प्रकारे माहिती झाली. सहशालेय उपक्रमात काही अडचणी आल्यास त्यावर मात करुन उपक्रम यशस्वी करण्याचा संशोधकाचा मानस आहे. सहशालेय उपक्रमामुळे विदयार्थ्यांचा सर्वागिण विकास व सामाजिकरणाच्या प्रक्रियेच चालना मिळते विदयार्थी आत्मविश्वासू, चंचल, विज्ञाननिष्ठ देशप्रेमी, सामाजिक जाणिव निर्माण होण्यास सहशालेय उपक्रम राबविणे अतिशय महत्त्वाचे आहे असे संशोधकास वाटते.

सहशालेय उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा प्रयत्न होत असल्याचे दिसून येते. डी.एस.कोठारी आयोगाने या बाबत आपल्या अहवालात असे म्हटले आहे की, चारित्र्याची घडण कृतीव्दारे होत असते, विद्यार्थी शाळा,घर आणि समाज यांचया प्रांगणात ज्या विद्याविषयक सामाजिक, सांस्कृतिक, शारीरिक व नैतिक कृती पार पाडत असतो त्यांचा कधीही पुसला न जाणारा ठसा त्याच्या मनावर उमटत असतो.

विद्यार्थ्यांच्या अभिरुची, अभिवृत्ती जाणून घेण्याचे काम सहशालेय उपक्रमांच्या मदतीने होते. त्यामुळे विद्यार्थ्यांत विविध मूल्ये रुजवता येतील. याचे आकलन या संशोधनावरुन होईल.

विद्यार्थ्यांच्या प्रज्ञा मुक्त करण्याच्या दृष्टींने पालक, शिक्षक व उच्च प्राथमिक शाळा विविध पातळीवर प्रयत्न करताना दिसतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

करण्याच्या दृष्टींने हे संशोधन उपयोगी पडेल विद्यार्थ्यांच्या ४H म्हणजे Head, Heart, Hand आणि Health च्या एकात्मिक विकासासाठी सर्जनशील उपक्रमांची आवश्यकता असते.

**२) समस्या विधान**

उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात सहशालेय उपक्रमाच्या योगदानाचा चिकित्सक अभ्यास

**३) संशोधनाची उद्दिष्टे**

१) सहशालेय उपक्रमाच्या व्दारे विद्यार्थ्यांमधील समूह प्रवृत्तीचा अभ्यास करणे.

२) उच्च माध्यमिक स्तरावरील विविध सहशालेय उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सामाजिक विकासाला पूरक गुणांचा शोध घेणे.

३) सहशालेय उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास साधणाऱ्या गुणांचा शोध घेणे.

४) उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांत सहशालेय उपक्रमाव्दारे जबाबदार नागरीकत्वाची, सुप्त गुणांच्या अविष्काराची, सामाजिक समस्यांची, सांस्कृतिक परंपरेची आणि समृध्द जीवनाच्या जाणीवेचा शोध घेणे.

५) सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त विविध उपक्रमांचा अभ्यास करणे.

**४) गृहितकृत्ये :-**

१) सहशालेय उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या भावनिक विकासाला मदत मिळते.

२) विद्यार्थ्यांच्या अंगी अनुशासन, आत्मविश्वास, सहकार्य, भावना, नेतृत्व इ. निर्माण होतात.

३) सहशालेय उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा विकास होतो आणि सौंदर्यदृष्टी विकसित होते.

४) सहशालेयय उपक्रमांमुळे उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या नैतिक मूल्यांचा विकास होतो.

५) सहशालेय उपक्रमांची अंमलबजावणी करताना अनेक समस्या निर्माण होतात.

**५) संशोधनाची व्याप्ती**

सदर संशोधन हे सोलापूर जिल्हयाशी संबंधित आहे. सदर संशोधन सोलापूर जिल्हयातील बार्शी तालुक्यांशी संबंधित आहे. उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात सहशालेय उपक्रमाच्या योगदानाचा चिकित्सक अभ्यास या विषयासाठी संशोधन करताना प्रथम सहशालेय उपक्रम कोणकोणते शाळेत राबविले जातात याचा अभ्यास केला आहे.

**६) संशोधनाची कार्यपध्दती**

१) **प्राथमिक स्त्रोत :-**

प्राथमिक स्त्रोत म्हणून २० मुख्याध्यापक, ६० शिक्षक यांची निवड करण्यात आली आहे.

२) **दुय्यम स्त्रोत :-**

दुय्यम स्त्रोतात माहितीचे संकलन करण्यासाठी शाळेत राबविण्यात येणारे सहशालेय उपक्रम

**७) तथ्य संकलनाची साधने :-**

सदर संशोधन अभ्यासासाठी प्रश्नावली या साधनांचा वापर करुन मिळालेल्या प्रतिसादावर संख्याकिय तंत्राचा वापर करुन शेकडेवारी करुन तथ्य संकलन करण्यात आले आहे.

**८) संशोधन कार्यपध्दती**

अ) संशोधन पध्दती:- प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीमधील सर्वेक्षण पध्दतीतील शालेय सर्वेक्षण पध्दतीचा संशोधकाने वापर केलेला आहे.

ब) संशोधनाचे साधन :- प्रस्तूत संशोधन हे उच्च प्राथमिक स्तरावर राबविण्यात येत असलेल्या सहशालेय उपक्रमाच्या योगदानाच्या संबंधीत असल्याने संशोधकाने माध्यमिक शिक्षकांसाठी प्रश्नावली व मुख्याध्यापकांसाठी मुलाखतसूची या साधनांचा वापर करुन माहिती संकलित केलेली आहे.

क) संशोधनाची नमूना निवड :- प्रस्तूत संशोधनासाठी संशोधकाने संभाव्यतेवर आधारित सुगम यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर करुन लॉटरी पध्दतीने १६८ पैकी ६० उच्च प्राथमिक स्तरावरील शिक्षक तर ६० पैकी २० मुख्याध्यापकांची नमुना म्हणून निवड केली आहे.

ड) संख्याशास्त्रीय साधने व तंत्रे :- प्रस्तूत संशोधनातून प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी संशोधकाने शेकडेवारी या तंत्राचा वापर केलेला आहे. संशोधकाने मुख्याध्यापकांना आर्थिक, नियोजन, सहकार्य, भौतिक सोयी व सुविधा तसेच इतर कोणकोणत्या अडचणी येतात व विदयार्थ्यांना अभ्यासपूरक उपक्रम कशा प्रकारे उपयोगी आहेत याची माहिती मुलाखतीच्या माध्यमातून घेतली आहे.

## ९. माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

- विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सहशालेय उपक्रम राबविणे महत्त्वाचे असते.
- विदयार्थ्यांच्या अंगी स्वयंशिस्त, प्रत्यक्ष अनुभव, वैज्ञानिक दृष्टीकोन, बौध्दिक व शारीरिक विकास होतो यासाठी सहशालेय उपक्रम राबविले जातात विदयार्थ्यांच्या प्रतिसादावरुन शाळेत राबविलेले जाणारे उपक्रम योग्य असल्याचे दिसून येते.
- प्रत्येक विदयार्थ्यांमध्ये सुप्त गुण लपलेला असतो. शिक्षकांना त्या गुणांचा शोध घेण्यासाठी सहशालेय उपक्रमाचा उपयोग होतो. त्यातून विदयार्थ्यांना प्रोत्साहन मिळते व तो आपल्याला संधी मिळाली म्हणून आनंदी होऊन सहशालेय उपक्रम व शाळा यामध्ये आनंदाने सहभागी होतो व सहशालेय उपक्रमाचा उद्देश पूर्ण होते.
- ाालकांची अपेक्षा असते विदयार्थ्यांनी फक्त अभ्यासच करावा त्यामुळे त्यांना इतर कार्यक्रमाची देखील गरज असते.
- सहशालेय उपक्रमामुळे विदयार्थी शारीरिक, बौध्दीक, मानसिक विकास होतो.
- शाळेच्या नियोजनामध्ये सहशालेय उपक्रमाचे नियोजन असल्यामुळे विदयार्थ्यांना वेळ मिळतो.
- सहशालेय उपक्रमाद्वारे विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सहशालेय उपक्रमातून प्रत्यक्ष अनुभव व अनुभूती देण्याचे कार्य सहशालेय उपक्रम करतात.
- सहशालेय उपक्रमाचा मूळ हेतूच विदयार्थ्यांमध्ये विविध प्रकारची मूल्य रुजवणूक करणे हा आहे तो साध्य होताना दिसतो.
- शाळेत फक्त अध्ययन-अध्यापनाचे कार्य न होता विदयार्थीच्या अंगी सर्वच गुण जोपासले जावेत. उदयाचा भारताचा नागरिक म्हणून त्यांच्या अंगी विविध गुण असणे आवश्यक आहे.
- विदयार्थ्यांवर शाळा, उच्च प्राथमिक स्तरावरच जर सकारात्मक दृष्टीने विविध मूल्यांची रुजवणूक झाली तर उदयाचा भारत हा २१ व्या शतकांची आव्हाणे पेलून डॉ. अब्दुल कलाम यांचे स्वप्न साकार करणार आहे त्यामुळे वरील सर्व मूल्य विदयार्थ्यांच्या अंगी रुजविली जातात हा प्रतिसाद अतिशय चांगला आहे.
- विदयार्थ्यांचा समाजाशी संपर्क तर येतोच परंतु समाजामध्ये प्रत्यक्ष जाऊन उपक्रम राबविताना समाजाची व समाजाशी असणाऱ्या प्रश्नाची चांगलीच नाळ कब-बुलबुल च्या माध्यमातून रुजविली जाते.
- एकाच उपक्रमातून सर्वच गुण रुजवणूक न होता वरील सर्वच उपक्रमातून विदयार्थ्यांना अभ्यासक्रमातील विविध घटकातील मूल्य व आशयाची प्रत्यक्ष अनुभव व अनुभूती मिळते व तो घटक कायम स्मरणात राहतो. हे वरील प्रतिसादावरुन दिसून येते.
- शाळेमध्ये सहल, गटचर्चा, व्याख्याने, विविध प्रदर्शने हे सर्वच सहशालेय उपक्रम शाळेत राबविले जातात व त्यातून अभ्यासक्रमातील विविध विषयातील आशय किंवा माहितीसाठी ज्ञानवृध्दी विदयार्थ्यांना मिळते.
- विविध क्रिडा स्पर्धांच्या आयोजनामुळे विदयार्थ्यांमध्ये खिलाडूवृत्ती निर्माण होते हार-जीत ही सकारात्मक घेऊन जीवनामध्ये प्रत्येक बाबींशी खेळाडू वृत्ती असणे आवश्यक आहे.
- शाळेमध्येे सहशालेय उपक्रम राबविण्यासाठी आवश्यक तेवढे आर्थिक बळ नाही त्यामुळे कोणताही उपक्रम राबविताना आर्थिक प्रश्न निर्माण होतो. आर्थिक निधीसाठी सतत परावलंबी रहावे लागते.
- शाळेस आवश्यक तेवढे क्रिडांगण नाही व अत्याधुनिक सांस्कृतिक सभागृह असावे अशी अपेक्षा प्रतिसादाच्या माध्यमातून शिक्षकांनी दिलेली आहे.

## १०) निष्कर्ष

संशोधकास प्राप्त झालेले संशोधनाचे ठळक निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१) ८०% शिक्षकांच्या मते शाळेमध्ये कब-बुलबुल हा उपक्रम राबविला जातो तर २०% प्रतिसादक शिक्षकांनी कब-बुलबुल उपक्रम राबविला जात नाही असा प्रतिसाद दिला आहे.

२) शाळेमध्ये सहल, गटचर्चा, व्याख्याने, विविध प्रदर्शने हे सर्वच सहशालेय उपक्रम शाळेत राबविले जातात व त्यातून अभ्यासक्रमातील विविध विषयातील आशय किंवा माहितीसाठी ज्ञानवृध्दी विदयार्थ्यांना मिळते.

३) २०% शाळेमध्ये योगासन शिबीराचे आयोजन केले जाते. तर विविध क्रीडा स्पर्धा यासाठी ४०% प्रतिसाद दिला आहे व ४०% प्रतिसाद हा प्रत्यक्ष खेळाडूशी भेट असा दिला आहे.

४) ४०% शिक्षकांच्यामते शाळेमध्ये क्रीडांगण व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी सभागृह असावे असा आहे तर ६०% प्रतिसादकाच्यामते पुरेसा आर्थिक निधी उपलब्ध करुन दयावा.

५) ४०% शिक्षकांच्यामते सहशालेय उपक्रम अंमलबजावणीसाठी विदयार्थी व शिक्षक हा घटक जबाबदार आहे तर २०% शिक्षकांच्या मते पालक जबाबदार आहेत=

६) २०% शिक्षकांनी व्याख्याने, समाजसेवा शिबीर, मैदानी स्पर्धा, पर्यावरण विषयक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम या सर्व पर्यायाना समान असा प्रतिसाद दिला आहे.

७) सहशालेय उपक्रमामध्ये विदयार्थ्यांना मार्गदर्शन होऊन थोरांचा आदर करावा हे विविध प्रसंगातून विदयार्थ्यांना थोरांचा आदर हे मूल्य रुजविले जाते.

८) सहशालेय, अभ्यासपूरक व सर्वच उपक्रमातून प्राधान्याने प्राथमिक स्तरापासून ते शिक्षणाच्या सर्वच स्तरावर देशभक्ती, राष्ट्रप्रेम हे मूल्य रुजविले जाते.

९) सहशालेय उपक्रमातून समाज हा महत्त्वाचा घटक असून विदयार्थ्यांमध्ये समाजामध्ये असणारे प्रश्न व त्याची शिक्षणाशी असणारी बांधलकी या दोन्ही बाबींवर विदयार्थ्यांना जाणीव करुन समाजसेवा व समाजरक्षण सर्वधर्म समभाव हे मूल्य रुजविले जाते.

१०) सांस्कृतिक उपक्रमाममुळे विदयार्थ्यांच्या अंगी असलेले सुप्त गुण सादर करण्यासाठी योग्य असे व्यासपीठ मिळाल्यामुळे तो आपले कौशल्य सादर करु शकतो व आपल्या अंगी नैसर्गिक असलेले गुणांचा विकास सांस्कृतिक उपक्रमामुळे पुर्ण करु शकतो.

११) ४०% मुख्याध्यापक यांच्यामते सहशालेय उपक्रमातून नैतिकमूल्यांचा व राष्ट्रीय एकात्मता या मूल्यांचा विकास होणे महत्त्वाचे आहे तर २०% प्रतिसादक मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्यामते विदयार्थ्यांचा सर्वोगीण विकास होणे महत्त्वाचे आहे.

१२) ८०% मुख्याध्यापक यांच्या प्रतिसादानुसार शाळेस स्वतंत्र क्रीडांगण व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी सभागृह आहे तर २०% प्रतिसादकांनी नाही असा प्रतिसाद दिला आहे.

१३) ६०% मुख्याध्यापक यांनी कौशल्याधिष्ठित उपक्रम यास प्रतिसाद दिला आहे तर ४०% मुख्याध्यापक यांनी प्रशिक्षणाचे प्रत्यक्ष आयोजन असावे यास प्रतिसाद दिला आहे.

**संदर्भसूची**

१. अहिरे, बी.जी, २००५, शैक्षणिक व्यवस्थापन, कोल्हापूर, फडके प्रकाशन,
२. बोरचाटे, शिवाजी, शैक्षणिक उपक्रम, २००५
३. गाडगीळ, स्वाती, २००५, शारीरिक शिक्षण डी.एड. प्रथम, २००८, सुविचार प्रकाशन, पुणे
४. नरवणे, मीनल, २००७, शैक्षणिक व्यवस्थापन. प्रथम वर्ष, निराली प्रकाशन
५. पाटील, वसंत, १९९५, जीवन शिक्षण, केंद्रशाळा विशेषांक
६. सगर, शिवाजी, शैक्षणिक व्यवस्थापन प्रथम वर्ष, सुविचार प्रकाशन
७. शिंदे, डी.बी.पाटील, बी.एम., २००९, भूगोल आशय अध्यापन पध्दती, फडके प्रकाशन